## नागपूर जिल्हयातील वाळु गटांचे पर्यावरण अनुमतीसाठी मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लगार नेमणुक करिता ई-निविदा

जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांच्याकडुन सर्व मान्यताप्राप्त् पर्यावरण सल्लागार (Accreatiated Environment Consultant) यांना कळविण्यात येते की, नागपूर जिल्हयातील सन 2019-20 व 2020-21 वर्षाकरीता प्रस्तावित होणा-या वाळु गटांना पर्यावरण अनुमती मिळविण्याकरिता, Form 1/1M, EIA, EMP, District Survey Report, Approved Mining Plan, आणि जनसुनावणी या करीता ई-निविदा खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मागविण्यात येत आहे.

सदर निविदेची कार्यवाही https:// nagpur.nic.in व https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | 18/12/2019 | |
| ई-निविदा स्विकृत करण्याचा दिनांक | 18/12/2019 | वेळ सकाळी 11.00 पासुन |
| ई-निविदा स्विकृत करणे बंद | 23/12/2019 | वेळ दुपारी 02.00 वाजता |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | 24/12/2019 | वेळ दुपारी 03.00 वाजता |

### अटी व शर्ती

1) ई-निविदा अर्ज शुल्क रु. 2000/- ऑन-लाईन पध्दतीने भरणा करावे लागेल.
2) पर्यावरण सल्लागार (Accreatiated Environment Consultant) यांनी "Mining of Minerals" या विभागात Quality Council of India (QCI) किंवा National Accredation Board of Education and Training यांच्याद्वारे मान्यता प्राप्त असणे आवश्यक आहे.
3) पर्यावरण सल्लागाराने (Accreatiated Environment Consultant) यांना Approved Mining Plan Preperation, पर्यावरण अनुमती मिळविण्याचा किमाण दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. (वाळू घाट (Sand Ghat) Mining Plan Preperation आणि पर्यावरण अनुमती मिळविल्याबाबतचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल.)
4) सदर निविदा नागपूर जिल्हयातील वाळू गटांना राज्य स्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरणाकडून पर्यावरण अनुमती मिळविण्याकरिता सन 2019-20 व 2020-21 या वर्षाकरिता आहे
5) पर्यावरण सल्लागाराला तालुका स्तरीय वाळू संनियत्रण समिती व तालुका स्तरीय तांत्रिक उप समिती यांच्यासह महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक:गौखनि 10/0219/प्र.क्र.9,/ख-1, दि. 03/09/2019 Sustainble Sand Mining Guidance 2016 Sand Mining Framework 2018, मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय, मा. राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निर्देश तसेच केंद्र शासनाचा पर्यावरण, व वातावरणीय बदल यंत्राचामार्फत वेळोवेळी निर्गमित

केलेल्या अधिसुचना, व केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसुचना निर्देशचा अधिन राहून.

6) वाळू गटांची निश्चिती निविदा करारनामाच्या दिनांकापासुन 15 दिवसाच आत करणे बंधनकारक राहील.

7) पर्यावरण सल्लागारांना वाळू गटाची निश्चिती झाल्यानंतर जिल्हा वाळू संनियत्रण समिती पुढे तालुकास्तरीय वाळू संनियंत्रण समितीचा शिफारसीसह प्रस्ताव सादर करावे लागेल व जनसुनावणी संबंधी कार्यवाही करावी लागेल. तदनंतर पर्यावरण अनुमती करिता राज्य स्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण यांचेकडे सादर करेल.

8) मा. राष्ट्रीय हरित लवाद, दिल्ली यांच्याकडे दाखल मुळ अर्ज क्र. १८६/२०१६ मध्ये मा. लवादाने दिनांक १३.०९.२०१८ पारीत आदेशानुसार वाळुगटाची जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

9) पर्यावरण सल्लागारांना वाळू गटांची निश्चिती झाल्यानंतर योग्य सनियंत्रणाकरिता वाळू गटांचे Digitization करणे अनिवार्य राहील.

10) पर्यावरण सल्लागार यांना District Survey Report, Approved Mining Plan आणि पर्यावरण अनूमती प्राप्त करून देणे, जनसुनावणी सबंधी कार्यवाही करणे बंधणकारक राहील.

11) वाळू गटांना राज्य स्तरीय पर्यावरण प्रभाव प्राधिकरणाची मान्यता नंतर पूर्ण रक्कम अनुज्ञेय राहील. तथापि वाळू गटाचे लिलाव झाल्यावर संबंधित लिलाव धारकाचा नावे पर्यावरण अनुमती वर्ग करून देणे, Mining Plan व इतर आवश्यक तांत्रिक कागदपत्रे संबंधित लिलाव धारकास हस्तांतरण करणे आवश्यक आहे.

12) राज्य स्तरीय पर्यावरण मूल्यांकन समिती व राज्य स्तरीय पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण यांच्या बैठकीस "Mining of Minerals" या प्रवर्गातील In house expert हजर राहणे बंधनकारक राहील व प्रतिनिधी पाठविण्यात येवू नये आणि सदर बैठकीत कुठल्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

13) निविदा मान्य झाल्यावर रू. 100/- (रू. शंभर फक्त ) च्या मूद्रांकावर करारनामा करावा लागेल.

14) निविदा मान्य झालेल्या पर्यावरण सल्लागार यांना जिल्हयातील संपूर्ण वाळू गट निश्चिती DSR तयार करणे, Approved Mining Plan आणि पर्यावरण अनुमती प्राप्त करून देणे बंधनकारक राहील.

15) अटी व शर्तीचे अनुपालन न केल्यास देय असलेली पूर्ण रक्कम कपात करण्यात येईल अथवा अंशत: कपात करून रक्कम देण्यात येईल.

16) देय असलेल्या रक्कमेवर नियमाप्रमाणे 2% आयकर (TDS) कपात करण्यात येईल.

17) पूर्व सुचना न देता कोणत्याही वेळी करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, नागपूर यांना राहील.

18) निविदेचा कराराचा अटी व शर्तीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

19) प्रशासकीय कारणास्तव निविदा नाकारण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

20) सदर प्रकरणी काही वाद उदभवल्यास नागपूर न्याय पालिकेचा अधिकार क्षेत्रात सोपविण्यात येतील.

21) निविदा मान्य झाल्यानंतर रू 2,00,000/- (रू. दोन लक्ष) बँक ग्यारंटी व करारनामा सादर करणे बंधनकारक राहील.

22) मा. न्यायालय व मा. हरित लवाद वेळोवेळी जे आदेश देतील ते लागू राहतील.

23) निविदा मान्य झाल्यावर कोणतेही अग्रीम रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.

24) एका वाळु गटाकरीता सर्वात कमी किंमत ई-निविदामध्ये प्राप्त होईल ती निविदा वरील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मान्य करण्यात येईल.

25) निविदामध्ये सहभागी होण्याकरिता आवश्यक कागदपत्रे.

अ. **तांत्रिक लिफाफा**

1. मान्यता प्राप्त पर्यावरण सल्लागार असल्याचे प्रमाणपत्र
2. PAN Card
3. Adhar Card
4. GST नोंदनी प्रमाणपत्र
5. दोन वर्षाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र
6. Income Tax Return मागील वर्षातील
7. रू. 100/- च्या मुद्रांकावर निविदामधील अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र

ब. **अधिक लिफाफा**

1. दर BOQ मध्ये सादर करून अपलोड करावा.

जिल्हाधिकारी, नागपूर